
केसी जोन्स

एक विलक्षण रेल्वे इंजिनियर



केसी जोन्स

एक विलक्षण रेल्वे इंजिनियर



मराठी : अश्लेषा

अमेरिकेच्या इतिहासातल्या नायकांमध्ये केसी जोन्सचं विशेष स्थान आहे. कित्येक लोककथांचे नायक काल्पनिक असतात पण केसी जोन्स मात्र खरोखरच होऊन गेला.

केसीला आगगाडीचं भारी प्रेम होतं. त्याला आगगाडीबद्दलच्या सगळ्याच गोष्टी खूप आवडायच्या. आगगाडीचा इंजिनियर व्हायचं एवढी एकच त्याची इच्छा होती.

आजकालच्या लहान मुलांना अवकाशयानात बसून वेगवेगळ्या ग्रहांवर जावंसं वाटत असेल पण केसी जोन्सच्या लहानपणी मात्र आगागडीच्या इंजिनमध्ये इंजिनियर म्हणून काम करणं हे सगळ्यात मोठ्ठं आणि मस्त स्वप्न होतं.

केसी इंजिनियर झाला सुद्धा आणि आपण एक शूर माणूस आहोत हे ही त्यानं सिद्ध करून दाखवलं.

आजकाल आगगाडीवर काम करणाऱ्या लोकांच्या भाषेत “केसी जोन्स” चा अर्थ असतो - इंजिनियर आणि तोही एकदम चपळ इंजिनियर!




केसी जोन्सचा जन्म केंटकीमधल्या केसी नावाच्या गावात झाला. गावाच्या नावावरूनच त्याचं टोपणनाव पडलं. इंग्रजीत गावाच्या नावाचं आणि केसीच्या नावाचं स्पेलिंग वेगळं असलं तरी उच्चार एकच आहे.

केसीचं खरं नाव होतं - जॉन ल्युथर जोन्स. त्याचा जन्म १८६४ साली नागरी युद्ध संपता संपता झाला.

तोपर्यंत अमेरिकेत आगगाडीचे मार्ग आले होते पण त्यांची संख्या खूप कमी होती. अजूनही बरीचशी मालवाहतूक बोटीने व्हायची. नदीच्या काठानं गावं वसली असल्यामुळे माणसांना बोटी जास्त जवळ होत्या. त्यांना लागणारी पीठं, चहा, कापडाचे तागे, काकवीच्या बरण्या बोटीतूनच येत असत.





नागरी युद्धानंतर मात्र लोहमार्ग वाढायला लागले. वाढतच गेले आणि वाढतच राहिले.

अगदी दूर पश्चिमेपर्यंत ते सगळीकडे पसरले. त्या भागात अजूनही जंगल माजलेलं होतं आणि रेडे फिरत असत.



इकडे-तिकडे-सगळीकडे मैलोनमैल आगगाडीचे रूळ पसरले तसं आजूबाजूला बदल घडायला लागले. लोहमार्गांना लागून गावं उभी राहिली. आता फक्त नदीकाठानंच गावं वसवण्याची गरज उरली नाही. गावागावातून धूर सोडत, शिट्टी वाजवत, झुकझुक करत धावणाऱ्या मालगाड्यांमध्ये सामान भरून येऊ लागलं. कधीकधी रुळावर आलेल्या गायींना बाजूला करायला आगगाडी थांबायची आणि गायी बाजूला झाल्या की पुन्हा झुकझुक करत पुढे जायला लागायची.

इंजिनियर होण्याइतकं भारी दुसरं काही नव्हतंच मुळी !

गोठ्यातल्या गवत ठेवलेल्या माळ्यावर बसून केसी मोठ्या, चकचकीत इंजिनमध्ये बसल्याचा आव आणायचा. इंजिनियर असण्याचा सराव व्हावा म्हणून गोठ्यातल्या जनावरांकडे बघून हात हलवायचा.

“कुठं जाऊन बसलायस रे पोरा?” वडिलांची अशी हाक आली की इंजिनियरचं सोंग टाकून केसीला कोंबडीच्या पिल्लांना दाणे टाकायला जावं लागायचं.


जसजशी लोहमार्गांची संख्या वाढली तसतशा अडचणी वाढायला लागल्या. जोरदार वादळं झाली की रूळ वाहून जायचे. डगमगत्या पुलांना भेगा पडायच्या. आगगाडीचे डबे गरम ठेवण्यासाठी वापरलेल्या स्टोव्हमुळे कधीकधी आगी लागायच्या. लुटारू गाडीत चढून हातातल्या बंदुकांचा धाक दाखवायचे आणि सगळ्यांचे पैसे चोरून न्यायचे.

“अरे देवा ,” केसीची आई म्हणायची, “तुला कशाला आगगाडीच्या रुळांवर काम करायचंय बरं?”

मात्र केसी लोहमार्गांवर काम करण्याइतका मोठा झाला तोपर्यंत परिस्थिती जरा सुधारली होती. एअरब्रेकचा शोध लागला होता. जुन्या पद्धतीच्या ब्रेकपेक्षा तो कितीतरी चांगला होता. लुटालुटीच्या घटनाही आता कमी झाल्या होत्या.


“अगं आता लोहमार्ग सुरक्षित व्हायला लागलेत.” केसी आपल्या आईला म्हणाला.

“हं,” तिनं उत्तर दिलं. तिला काही तितकीशी खात्री वाटत नव्हती पण केसीला आवरणं अशक्य आहे हे तिला दिसत होतं.





अर्थात, थेट इंजिनियर म्हणून काम करणं केसीला शक्य नव्हतं. ते सगळ्यात वरच्या दर्जाचं पद होतं. सुरुवातीला त्यानं इंजिन-दुरुस्तीच्या गॅरेजमध्ये लहान-मोठी कामं केली. दररोज तो त्या वर्कशॉपमध्ये पडतील ती कामं करायचा. त्याला इंजिनांच्या आसपासच वावरायला आवडायचं. एक ना एक दिवस त्याला स्वतःच इंजिन चालवायचं होतं.



काही काळ गॅरेजमध्ये काम केल्यावर एका मालगाडीवर कोळसेवाला म्हणून तो कामाला लागला.

त्या काळात कोळसेवाल्याचं काम फार कष्टाचं असायचं. त्यासाठी इंजिनियरबरोबर त्याच्या डब्यातून प्रवास करावा लागायचा आणि ते केसीला भारी आवडायचं पण त्या कामाची तेवढी एकच गोष्ट चांगली होती. आगगाडी धावत असताना वाफ येत राहावी म्हणून कोळसेवाल्याला कोळसा उपसून सतत बॉयलरमध्ये घालत राहावा लागे.

बॉयलरमधलं पाणी गरम होऊन वाफ बाहेर पडण्याइतका कोळसा नसेल तर आगगाडी वेळेत पोहोचू शकायची नाही पण गाडी वेळेवर पोहोचणं अगदी आवश्यक असायचं. आगगाडी ठरल्या वेळी स्टेशनवर पोहोचायलाच लागायची. कोळसेवाल्याला हरघडी कोळसे उपसायचे कष्ट घेणं आवश्यक होतं. ते करता करता पाठ मोडून येई आणि माणूस नुसता घामेघूम होऊन जात असे. मात्र कोळसेवाला कुशल असेल तर आज ना उद्या तो इंजिनियर होणार हे नक्की.

सुरुवातीच्या काळातल्या पॅसेंजर आगगाड्या मुळीच आरामशीर नसत. तरीही एका गावातून दुसऱ्या गावाकडे प्रवास करायला लोक त्या वापरत. कडक लाकडी बाकड्यांवर बसून धक्के खात, डब्यातलं जेवण जेवत आणि स्टोव्हवर हात शेकत ते प्रवास करत. मध्येच कधीतरी कंडक्टर येऊन तिकीट फाडून जाई. बाळं रडत.

काही आगगाड्या कमी पल्ल्याच्या असत तर काही लांब पल्ल्याच्या. पश्चिमेकडच्या नवीन प्रदेशात प्रवास करणारे पायोनियर्स आगगाडीनं प्रवास करायला लागले होते. सगळीकडे बदल घडत होते.

केंटकी मधलं केसी गाव लहानसं होतं. दुकानात खरेदी करायला जाताना स्त्रिया बॉनेट घालून जायच्या. लहान मुलं घोड्यांवर बसून धूळभरल्या रस्त्यावरून फिरायची. केसीमध्ये तसं विशेष काही घडायचं नाही पण रेल्वे स्थानक हे त्या गावातलं सर्वात महत्त्वाचं आणि मजेचं ठिकाण होतं. स्थानकात गाडी येत असताना लहान पोरं बाजूला उभी राहून इंजिनियरला हात करायची.

“आली ! आली !” आगगाडी आलेली दिसते का ते बघायला स्थानकाच्या छपरावर चढलेला केसी ओरडायचा.

“खाली उतर बघू तिथून !” स्टेशनमास्तर त्याला रागे भरायचा पण केसी कुठला ऐकायला? तो इंजिनियरला हात करत राहायचा आणि इंजिनियरही त्याला उलटा हात करायचा.





आगगाडी निघून गेली की, पोरं पांगायला लागायची आणि मग केसी घसरत खाली यायचा.

“चल, पळ आता घरी,” स्टेशनमास्तर गुरगुरायचा.

“एक दिवस मी इंजिनियर होणार आहे,” केसी म्हणायचा.

“मी पण,” इतर पोरंही ओरडायची. मात्र त्यांच्यापैकी बहुतेक सगळे मोठेपणी बँकेतले कारकून नाहीतर शेतकरी, शाळामास्तर किंवा फिरते विक्रेते झाले. त्यांना ते चालून गेलं पण केसी जोन्सला मात्र आगागडीचा इंजिनियर सोडून दुसरं काहीही व्हायचं नव्हतं.

“आधी हाडं न मोडता खाली ये,” स्टेशनमास्तर इशारा द्यायचा. “आधी घरी पळ आणि कामं कर.”


केसीला खरंच घरी काम असायचं. त्याचे वडील शेतकरी होते. अंडी गोळा करायची, गाईचं दूध काढायचं, शेतं नांगरायची, अशी बरीच कामं असायची. मात्र केसीनं आगगाड्यांची, एक ना एक दिवस इंजिनियर होण्याचं स्वप्न बघणं कधीच सोडलं नाही.


धुराचे लोट सोडत रुळांवरून धावणाऱ्या त्या अजस्र लोखंडी धुडाशी कशाचीच तुलना होऊ शकत नव्हती.

रात्री ऐकू येणाऱ्या आगगाडीच्या शिट्टीइतका सुंदर आवाज कशाचाच नसेल.

केसी जोन्सला स्वतःचं स्वतंत्र इंजिन मिळालं तेव्हा तो सव्वीस वर्षांचा होता. इंजिनियर होण्यासाठी तो तसा लहानच होता. तरीही त्याला त्यासाठी दहा वर्षं भरपूर कष्ट करावे लागले होते.

इलीनॉय सेंट्रल लाइनवर काम करणारे सगळे कामगार केसीला चांगला ओळखत होते आणि त्यांचा तो खूप आवडता होता. तो इंजिनियर होणार हे कळल्यावर सगळेजण त्याच्या पाठीवर थाप मारत आणि त्याच्याशी हस्तांदोलन करत त्याचं अभिनंदन करायला गोळा झाले.






“केसी, गाडी वेळेवर आणत जा बरंका !”

“माझा तोच उद्देश आहे,” काम करताना घालायचा विशिष्ट पोशाख आणि पायात भरभक्कम बूट घालून भोवती जमलेल्या कामगारांना तो म्हणाला.

“केसी, आता एक शिट्टी घेऊन टाक,” यार्ड फोरमननं त्याला आठवण करून दिली.

“मी सगळ्यात भारी शिट्टी घेऊन येणार आहे,” केसी मोठ्यांदा म्हणाला. त्याचा चेहेऱ्यावरून उत्साह उतू जात होता. कधीपासून तो ह्या दिवसाची वाट बघत होता.



इंजिनियरनं आपापली शिट्टी घेऊन येण्याची त्या काळी पद्धतच होती. केसीनं स्वतःसाठी अगदी ऐटबाज शिट्टी घेतली. त्याला सहा नळ्या होत्या आणि लवकरच केसीच्या मार्गावर राहणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या शिट्टीचा आवाज ओळखीचा झाला. केसी जोन्सची आगगाडी गावातून जायला लागली की, पोरंसोरं, शेतकरी, कारकून, गृहिणी सगळ्यांना कळायचं.

शिट्टीव्यतिरिक्त केसी त्याच्या वेगासाठीही ओळखला जायचा. बोलून दाखवल्याप्रमाणे तो गाडी कायम वेळेवर आणायचा.

लवकरच त्याची नेमणूक कॅन्टॉन ते मेम्फिस ह्या मार्गावरून जाणाऱ्या अतिजलद गाडीवर झाली. मिसीसिपीमधल्या कॅन्टॉनवरून टेनेसीमधल्या मेम्फिसपर्यंत ही गाडी जात असे आणि केसी जोन्स त्या अतिजलद आगगाडीचा इंजिनियर होता.

त्याच्या इंजिनाचा क्रमांक होता ३८२ आणि तो मोठ्या अभिमानानं त्याची काळजी घ्यायचा. प्रत्येक प्रवासानंतर बॉयलरवरची काजळी स्वच्छ करण्याची तो खबरदारी घ्यायचा. पितळेची उपकरणं घासूनपुसून लख्ख ठेवायचा. इंजिनावरचा रंग कायम नवीन असायचा. सगळं कसं चकचकीत आणि स्वच्छ असायचं.

“शप्पथ केसी,” सिम वेब नावाचा त्याचा फायरमन गमतीत म्हणाला, “ह्या इंजिनात खाली जमिनीवर बसून जेवतासुद्धा येईल.” आणि ते अगदी खरं होतं.

गावागावातून झुकझुक करत वेगानं जाताना केसीचा एक हात कायम गाडीच्या झडपेवर असायचा. रस्त्यात अनवाणी उभ्या असलेल्या पोरासोरांकडे बघून तो हात हलवत असे. त्याच्या त्या सहा नळ्यांच्या शिट्टीचा आवाज डोंगरात घुमत असे. इकडे सिम वेब कोळसा उपसायचा आणि तिकडे ३८२ नंबर रुळांवरून धावायला लागायची.





आपल्या उंच जागेवरून केसीला आजूबाजूला मैलोनमैल पसरलेला प्रदेश दिसत असे. त्या केबीनमध्ये बसल्यावर त्याला नेहेमीच मस्त वाटायचं. त्याला पहिल्यापासून तिथेच बसायचं होतं. हवा खराब असेल किंवा समोरचे रूळ धड नसतील तरीही केसी आगगाडी वेळेतच आणायचा.



२८ एप्रिल १९०० च्या रात्री हवामान आणि रूळ दोन्ही पार खराब होते. पाऊस कोसळत होता. वाटेतले रूळ चमचमत होते. जोराच्या पावसामुळे समोरचा रस्ता अगदी धूसर दिसत होता. आजूबाजूची गावं अंधारात बुडाली होती. कॅन्टॉन ते मेम्फिस हा १८८ मैल लांबीचा पल्ला होता. वाटेत तीव्र वळणं आणि चढाचा रस्ता होता. चांगल्या हवेत देखील हा प्रवास करणं सोपं नव्हतं. समोर कोसळणाऱ्या पावसाकडे एकटक बघत केसी गाडीच्या झडपेवर हात धरून उभा होता.

सकाळ झाली तसं मेम्फिसच्या ट्रेन यार्डातल्या लोकांनी ते वादळ पाहिलं आणि धुक्यात हरवलेल्या रुळांकडे एक नजर टाकली.

“हा कसा काय आज वेळेवर येणार?” ते एकमेकांना विचारू लागले.

“केसी कधीच वेळ चुकवत नाही,” एकजण बढाई मारत म्हणाला. “एवढ्याशा पावसानं काही त्याचा वेग कमी होणार नाही.”

मात्र हा काही ‘एवढासा पाऊस’ नव्हता. मोठ्ठं वादळ आलं होतं. वाटेतले रूळ वाहून गेले असण्याचीही शक्यता होती. पुलाखालून वाहणाऱ्या नदयांचं पाणी वाढत होतं. विजा कडाडत होत्या.

“केसी वेळ गाठणार म्हणजे गाठणार.” तोंडातला पाईप चावत आणि डोळे बारीक करून रुळाकडे नजर लावत तो मगाचचा माणूस म्हणाला.

इतरांनी माना हलवल्या.

“ह्यावेळेस वेळ गाठणं अवघड आहे,” ते म्हणाले. “ह्या असल्या हवेत शक्यच नाही.”

आता उजाडायला लागलं होतं. कोणालातरी लांबवर ३८२ नंबरच्या गाडीचा दिवा लुकलुकताना दिसला.

“आला, आला !” टोपी हवेत उडवत तो म्हणाला. “तो बघा आला!”

केसी अगदी वेळेत मेम्फिसला पोहोचला होता. तो भयंकर दमला होता. केबिनमधून खाली उतरल्यावर त्याला अगदी बरं वाटलं.





“काय केसी, चांगली दमछाक झाली का?” यार्डमन त्याला हात करत म्हणाला.

“नाहीतर काय,” केसी हसत म्हणाला. केसी चांगला उंचापुरा आणि देखणा होता पण थकल्यामुळे त्याचा चेहेरा पार उतरून गेला होता. रात्र चांगलीच लांबली होती. फायरमन त्याच्याबरोबर चालत-चालत यार्डाच्या दिशेला निघाला. वाटेत कामगार त्या दोघांना हात उंचावून अभिवादन करत होते.

“जमवलंस हां केसी !”



परतीची गाडी कॅन्टनपर्यंत नेणारा इंजिनियर आजारी होता.

केसीनं आपल्या विस्कटलेल्या केसांतून हात फिरवला.

“केसी, तू जाशील का गाडी घेऊन?” असं त्या निरोप्यानं विचारेपर्यंत तो पायात बूट चढवायलाही लागला होता.

“सिमला बोलावणं पाठव,” दाराकडे धावत जात केसी म्हणाला.

केसीला मात्र आता मस्तपैकी झोप हवी होती. इंजिनाची तपासणी करायला, ते घासून पुसून लख्ख करायला आणि केबिनमध्ये ‘खाली बसून जेवता येईल’ इतकी स्वच्छता करायला उद्या भरपूर वेळ होता.

त्यानं पायातले बूट उतरवले आणि तो ताबडतोब झोपी गेला.

केसीचा डोळा लागून थोडाच वेळ झाला होता तेवढ्यात एक निरोप्या निरोप घेऊन आला. डोळे चोळत केसीनं उत्तेजित स्वरात बोलणाऱ्या त्या निरोप्याचं बोलणं ऐकून घेतलं.



यार्डात पोहोचल्यावर केसीला ३८२ नंबर धूर ओकत प्रवासाला सज्ज असलेली दिसली.

“निदान पाऊस तरी थांबलाय,” सिम वेबकडे बघत तो गमतीत म्हणाला. सिम आधीच येऊन कोळसा उपसायला लागला होता. केसीचा फायरमन म्हणून काम करण्याचा त्याला अभिमानच वाटत असे पण तो ही आदल्या रात्रीच्या भर पावसातल्या लांबलचक प्रवासाला कंटाळला होता.


“झोप काय उद्याही भरून काढता येईल रे,” असं म्हणत केसी केबीनमधल्या आपल्या जागेवर जाऊन स्थिरस्थावर झाला. तेवढ्यात फोरमन धावत आला.





“केसी!” केबीनकडे बघत तो ओरडला, “तुला अगोदरच एक तास पस्तीस मिनिटं उशीर झालाय.”

केसी त्याच्याकडे बघून गालातल्या गालात हसला. त्याला आता तितकंसं दमल्यासारखं वाटत नव्हतं. ३८२ नंबरमध्ये चढलं की मस्त वाटायचं. त्यानं कपाळाकडे हात नेत फोरमनला सलाम केला. *मी बरोबर उशीर भरून काढीन* - असंच त्याला त्यातून सांगायचं होतं.



चाकं फिरायला लागली. केसी आणि सिम आगगाडी घेऊन निघाले होते. इंजिनाला प्रवाशांच्या आणि टपालाच्या मिळून बारा बोग्या जोडल्या होत्या.

इंजिनाच्या बरोबरीनं धावत फोरमन म्हणाला, “केसी, पुढे दोन मालगाड्या आहेत. त्यावर लक्ष ठेव. वॉन आलं की त्यांना बाजूला घेऊ.”

केसीनं उत्तरादाखल हात हलवला. ३८२ आता वेगानं धावू लागली होती. फोरमनला तो वेग झेपेना. तो मागे पडला आणि अंधारात नाहीशा होणाऱ्या त्या लांबसडक आगगाडीकडे बघत राहिला.


३८२ नं सिग्नल ओलांडून वेग पकडला तशी त्याला केसीची शीळ ऐकू आली

"गुड लक!" फोरमन ओरडला पण केसी ऐकण्याच्या टप्प्यापलीकडे गेला होता.

३८२ रात्रीच्या अंधारात धावू लागली. रुळांवर चाकं वाजायला लागली, धुराडं धूर ओकू लागलं. सिम भट्टीत कोळसा टाकत होता आणि केसीची शीळ आसपासच्या माळरानात घुमत होती.

ताशी पन्नास, साठ, सत्तर मैल.

सार्डिस नावाच्या गावात प्रवाशांसाठी गाडी थांबणार होती. ३८२ नं उशीरातला थोडा वेळ भरून काढला होता आणि आता पुन्हा ती आपल्या मार्गाला लागली होती. सिमच्या चेहेऱ्यावरून घाम गळत होता. घामामुळे त्याचे पिळदार स्नायू चमकत होते. मागे पडलेला वेळ ते भरून काढत होते आणि ते ही अगदी भराभर.



ताशी सत्तर, ऐंशी, नव्वद मैल.

अंधारात बुडालेले टेलिग्राफचे खांब भराभर मागे पडत होते. आगगाडीचे डबे खडखडत इकडून तिकडे हलत होते. चाकं वेगानं पुलावरून धावत होती आणि रूळ बदलत होती. समोरचा मार्ग सरळ होता.

पुढच्या थांब्याला पोहोचेपर्यंत केसीनं आणखी काही वेळ भरून काढला होता.

ताशी ऐंशी, नव्वद, शंभर मैल.

वॉन जवळ आलं तेव्हा केसीनं जवळजवळ वेळ गाठलीच होती.

“आपण हे जमवणार बघ सिम !” थ्रॉटलवर हात ठेवत केसी म्हणाला.

इकडे पुढे एक मालगाडी अगोदरच बाजूच्या मार्गावरून धावायला लागली होती. दुसरी मालगाडीही तिकडे वळली आणि तिची हवेची नळी तुटली. ब्रेक अडकले. दोन बोग्या अजून मुख्य मार्गावरच होत्या.

आता काय करता येईल हे बघण्यासाठी त्या आगगाडीतल्या कर्मचाऱ्यांनी घाबरून बाहेर उड्या मारल्या.

“लवकर दुरुस्ती करा!”

“आधी ते ब्रेक सोडवा!”

आरोळ्या अंधाराला भेदून जात होत्या. “आधी ती गाडी बाजूला घ्या !”



रात्रीच्या अंधारातून या दिशेला येणाऱ्या ३८२ नंबरचे पुढचे दिवे त्यांना अगोदरच दिसू लागले होते.

तुटलेली नळी दुरुस्त करायला वेळ नव्हता

दिवे जसजसे जवळ येऊ लागले तसतसे ते कर्मचारी घाबरून तिकडे बघायला लागले.

अंधारात शीळ घुमली.

"अरे देवा, हा केसी जोन्स दिसतोय !"





दिवे जवळ-जवळ येत होते. कर्मचाऱ्यांपैकी एकानं एक स्फोटक हातात घेतलं आणि तो रुळावरून येणाऱ्या गाडीच्या दिशेनं धावला. ते स्फोटक म्हणजे सूचना देणारं एक लहानसं शस्त्रच होतं. भीतीनं तो बधिर झाला होता. इतक्या वेगानं धावणं त्याला अशक्य होतं ! ते शस्त्र ठेवायलाही वेळ नव्हता ! आगगाडी खूपच जवळ आली होती. त्याला ते ठाऊक होतं पण तरीही तो जमेल तितक्या वेगानं आगगाडीच्या दिशेनं धावला आणि ते स्फोटक रूळांवर ठेवलं.


३८२ नंबर धडधडत त्यावरून गेली आणि त्याचा स्फोट होऊन जोरदार आवाज झाला. केसीला समोर थांबलेल्या आगगाडीचे मागचे लाल दिवे दिसले.

सिम वेबने देखील तेव्हाच ते दिवे पाहिले. “केसी..” तो घाबरून बघत राहिला. त्याच्या हातातलं कोळशाचं फावडं थरथरलं.

केसीनं ब्रेक दाबले, त्याच्या शिट्टीचा आवाज जोरात घुमला, चाकं रुळांवर घासून ठिणग्या उडाल्या.

“सिम, उडी मार !” तो ओरडला. तो आता उभा राहून अंगातल्या सर्व शक्तिनिशी ब्रेक दाबत होता.

अंधारातून समोरच्या गाडीचे दिवे जवळजवळ येत होते. खालची जमीन धावताना दिसत होती. सिमनं खाली नजर टाकली आणि काकुळतीला येऊन केसीकडे बघितलं.



“चल केसी..”

पण केसीनं ब्रेक दाबून ठेवला. “सिम, उडी मार !” त्यानं पुन्हा हुकूम सोडला. सिमनं अंधारात, धावत्या गाडीतून उडी टाकली आणि गडगडाटी आवाज करत ३८२ नंबर समोर उभ्या असलेल्या मालगाडीच्या मागच्या भागात घुसली.

धातूचे आणि लाकडाचे तुकडे हवेत उडाले. चेंदामेंदा झालेल्या बॉयलरमधून भपकन वाफ बाहेर पडली. मालगाडीची मागच्या बाजूचा पार चेंदामेंदा झाला आणि डबे निसटून घरंगळत रुळांवरून बाजूला सरकले. मोठ्ठा आवाज झाला.

काही क्षणातच त्या अंधारात कंदिलांचे ठिपके चमकायला लागले. थक्क झालेला मालगाडी आणि आगगाडीतला कर्मचारी वर्ग आता काय बघायला मिळणार ह्या विचाराने अपघाताच्या ठिकाणी धावला. आश्चर्य म्हणजे, ३८२ नंबरच्या चेंदामेंदा झालेल्या इंजिनामागचे प्रवासी डबे अजूनही रुळावरच होते. एकही प्रवासी मृत्यूमुखी पडला नव्हता.

केसीला आगगाडी पूर्णपणे थांबवता आली नव्हती. असं होणार ह्याची त्याला कल्पना होती

पण ब्रेक दाबून ठेवल्यामुळे आगगाडीचा वेग पुरेसा कमी होऊन एवढ्या सगळ्या लोकांचे प्राण वाचले होते. सिमबरोबर त्यानेही उडी मारली असती तर अपघात आणखी मोठा झाला असता.

तिकडे जमिनीवर उडी मारल्यावर सिम वेब बेशुद्ध होऊन पडला होता पण जिवंत होता.

केसी जोन्स मात्र मरण पावला होता. शिट्टीच्या दोरीचा एक तुकडा अजूनही त्याच्या हातात घट्ट धरलेला होता.



केसी जोन्सला ओळखणाऱ्या सगळ्या रेल्वे कामगारांना तो फार आवडायचा. त्यांनी एक चांगला मित्र गमावला होता. त्याच्या मृत्यूनंतर काहीच दिवसांनी वॉलेस सॉण्डर्स नावाच्या एका कामगारानं केसीला श्रद्धांजली म्हणून एक गाणं लिहिलं. केसी कायम त्याला प्रोत्साहन देत असे आणि वॉलेस सॉण्डर्स ते विसरला नव्हता.

लोक आजही ते गाणं गातात. केसी जोन्सला लोक कधीच विसरणार नाहीत.



समाप्त